# वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
## महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय,
## (नोंदणी क्र. GBBSD ४८८/२०१९)
## कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१.

महाराष्ट्र शासन

kandivali.esis.@gmail.com

क्र.कांसारु/महा-राकाविसो/म.भांडार/ हायपो सोल्युशन व X-Ray Films निर्लेखन / 7728 /२५ दिनांक: 13 JAN 202

प्रति,
मा.अवर सचिव,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०१२.

विषय:- वैद्यकीय अधिक्षक माहा- रा.का.वि.सोसा.रुग्णालय, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) निरुपयोगी एक्स-रे फिल्म निर्लेखनबाबत.

मा.महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, वैद्यकीय अधिक्षक महा- रा.का.वि.सोसा. रुग्णालय, आकुर्ली रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई १०१ येथील महाराष्ट्र शासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जीएकसी-१०१६/ प्र.क्र.०७/१६/विनियम, दि.२२.०६.२०१६ नुसार निर्लेखन केलेले सिलबंद दरपत्रके मागविण्याकरीता जाहीरात नमुना जोडण्यात येत आहे.

याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या नमुन्यातील सिलबंद दरपत्रके मागविणारी जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर कृपया जाहिरात अपलोड करण्यात यावी ही विनंती.

| अनु.क्र. | तपशील | विक्री करावयाचा एकूण साठा | शेरा |
|---|---|---|---|
| १ | निकामी एक्स-रे फिल्म | २१२८ किलो | - |

(सोबत निविदा नमुना अटि,शर्ती व विक्री करण्यात येणाऱ्या निकामी एक्स-रे फिल्म ची माहिती वरीलप्रमाणे आहे.)

डॉ. केतन छेडा
**वैद्यकीय अधीक्षक**
महा.रा.का.वि.सो.रुग्णालय कांदिवली मुंबई.

**प्रत,**
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महा-राकावि सोसायटी, वरळी यांच्या माहितीसाठी सविनय सादर.

(कृ.मा.पा.)

**अटी व शर्ती:-**

१) महा-रा.का.वि.सोसा. अंतर्गत रुग्णालय कांदीवली,मंबई. येथील निकामी एक्स-रे फिल्म च्या साठयाची रक्कम प्रति किलो या दराने दर पत्रकामध्ये नमुद करण्यात यावा.

२) निकामी एक्स-रे फिल्मच्या साठयाची खरेदी संदर्भात आपल्या निविदा दर प्रति किलो प्रमाणे मान्य होईल, त्या रकमेचा संबंधीत कार्यालयास राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राप्ट अथवा रोख रक्कमेचा भरणा करावा. त्यानंतरच निकामी निकामी एक्स-रे फिल्म चा साठा उचलण्यास परवानगी देण्यात येईल.

३) निकामी एक्स-रे फिल्म चा साठा नेतांना कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र मिळणार नाही. फक्त डिमांड ड्राप्ट अथवा रोख रक्कमेचा भरणा केल्याची पावती मिळेल.

४) निकामी निकामी एक्स-रे फिल्म ज्या कंटेनरमध्ये ठेवण्यात आले आहे त्याच कंटेनरमधील साठा घेऊन जाण्यास या कार्यालयाकडून Gate Pass देण्यात येईल

५) निकामी निकामी एक्स-रे फिल्म च्या साठा विक्रि करताना कोणत्याही तक्रारीस वाव राहणार नाही. याकरीता संपुर्ण विक्रि प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यात येईल.

६) रुग्णालयातून निकामी निकामी एक्स-रे फिल्मचा साठा उचलतांना रुग्णालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. तसे नुकसान झाल्यास संबंधित वैद्यकीय अधीक्षक, आवश्यक रक्कम नुकसानी प्रित्यर्थ वसूल करु शकतील.

७) आयत्यावेळी आपण घातलेली कोणतीही अट मान्य केली जाणार नाही.

८) निकामी निकामी एक्स-रे फिल्मचा साठा उचलण्याबाबतचे वेळापत्रक या कार्यालयास आगावू कळविण्यात यावे. आपल्याकडून वेळापत्रक प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना सुचित करण्यात येईल.

९) निकामी निकामी एक्स-रे फिल्मचा साठा कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उचलता येईल.

१०) सदर निर्लेखित निकामी निकामी एक्स-रे फिल्म साठा खरेदी करणेस ईच्छुक निविदाधारकानी दि. १६/०१/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत महा.राज्य कामगार रुग्णालय कांदिवली, पूर्व मुंबई-४०० १०१ येथे स्वत: किंवा प्रतिनिधी मार्फत पाहाणी करावी. दि.२१.०१.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत दरपत्रके सादर करावीत विहीत वेळे नंतर सादर केलेला किंवा पोस्टाने पाठविलेल्या दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत. यास्तव विक्री दरपत्रक या कार्यालयात पाहणी करीता ठरलेल्याअंतिम दिनांकापूर्वी स्विकारल्या जाणार नाहीत.

११) दरपत्रकांसोबत अनामत रक्कम रु.१५,०००/- D.D. स्वरुपात वैद्यकीय अधिक्षक रा.का.वि.यो.रुग्णालय कांदिवली, मुंबई या नावाने या रुग्णालयाच्या रोखपाल विभागात जमा करावेत.

१२) सदर विक्री दरपत्रक पध्दतीने करण्यात येणार असल्याने दरपत्रक बंद लिफाफयावर निकामी एक्स-रे फिल्म दरपत्रक असे स्पष्ट नमुद करुन वैद्यकिय अधिक्षक, महा-राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, कांदिवली, पूर्व मुंबई-४०० १०१ यांच्या नावे दरपत्रक सादर करण्यात यावी. निकामी एक्स-रे फिल्म खरेदी करीता शासनाने ठरविलेल्या नियमावली प्रमाणे आवश्यक सर्व प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड व GST नंबर सर्टिफिकेटची छायांकित्र प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रक ग्राहय धरली जाणार नाही.

१३) सर्वाधिक उच्चत्तम दर असणारे दरपत्रधारक यशस्वी म्हणून घोषित केले जाईल, यशस्वी म्हणून दरपत्रधारक यांना विक्री आदेश निघाल्यानंतर संबंधीत विक्री बाबत कोणतीही तक्रार करणेस वाव असणार नाही.

१४) मा. वैद्यकीय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,कांदिवली (पूर्व) यांना कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

Medical Superintendent
ESIS Hospital
Kandivali (East),